# हिंदू धर्मिय खातेदार अविवाहित मयत झाल्यास त्याला वारस कोण असतील?

डॉ. संजय कुंडेटकर,
उपजिल्हाधिकारी
बी.ए; एन.डी.; डी.मॅग; एम.बी.ए; एम.डी.; पीएच. डी.

मयत खातेदाराचे वारस, त्या खातेदारास लागू असलेल्या वैयक्तीक वारसा कायद्याप्रमाणे निश्चित करावे लागतात.

मयत खातेदार हिंदू, बौध्द, जैन, शिख असल्यास, हिंदू वारसा कायदा १९५६ प्रमाणे वारस निश्चित केले जातात,

मयत खातेदार मुस्लिम धर्मिय असल्यास मुस्लिम वारसा कायदा आणि मयत खातेदार पारसी, ख्रिश्चन धर्मिय असल्यास भारतीय वारस अधिनियम, १९२५ अन्वये वारस निश्चित केले जातात.

मृत्युपत्र न करता, अविवाहीत असतांना मयत झालेल्या हिंदू धर्मिय खातेदाराच्या बाबतीत हिंदू वारसा कायदा १९५६, कलम ८ अन्वये प्रथम वर्ग १ च्या वारसांना मयताच्या संपत्तीत वारसाधिकार असतो. या यादीत एकूण सोळा वारस नमूद आहेत.

तथापि, मयत खातेदार अविवाहित असल्याने त्याला वर्ग १ च्या वारस यादीतील, "आई" वगळता एकही वारस लागू होणार नाही सबब, व्यक्तीची **‘आई’** ही त्याची वर्ग १ ची वारस असेल.

अविवाहीत खातेदाराची आई हयात नसल्यास,

- वर्ग २ वारसांच्या ९ गटांपैकी, गट (एक) मधील **‘वडील’** वारस ठरतील.

- वडील हयात नसतील तरच, वर्ग २ वारसांपैकी, गट (दोन) मधील **‘भाऊ’** आणि **‘बहीण’** हे वारस ठरतील आणि सामाईकपणे हिस्सा घेतील.

[भाऊ व बहीण यामध्ये एकच आई परंतु भिन्न वडील असलेला भाऊ किंवा बहीण यांचा समावेश होणार नाही]

- वर्ग २ वारसांपैकी, गट (तीन) अविवाहीत मयत व्यक्तीस लागू नाही.

- वर्ग २ वारसांच्या ९ गटांपैकी, गट (दोन) मधील एकही वारस हयात नसेल तरच, गट (चार) मधील '**भावाचा मुलगा**', '**बहिणीचा मुलगा**', '**भावाची मुलगी**', '**बहिणीची मुलगी**' वारस ठरतील.
- वर्ग २ वारसांच्या ९ गटांपैकी, गट (चार) मधील एकही वारस हयात नसेल तरच, गट (पाच) मधील '**वडीलांचे वडील**', '**वडीलांची आई**' वारस ठरतील.
- वर्ग २ वारसांच्या ९ गटांपैकी, गट (पाच) मधील वारस हयात नसतील तरच, गट (सहा) मधील '**भावाची विधवा**' वारस ठरेल.

- वर्ग २ वारसांच्या ९ गटांपैकी, गट (सहा) मधील वारस हयात नसतील तरच, गट (सात) मधील ‘**वडीलांचा भाऊ**’ ‘**वडीलांची बहीण**’ वारस ठरतील.

- वर्ग २ वारसांच्या ९ गटांपैकी, गट (सात) मधील वारस हयात नसतील तरच, गट (आठ) मधील ‘**आईचे वडील**’, ‘**आईची आई**’ वारस ठरतील.

- वर्ग २ वारसांच्या ९ गटांपैकी, गट (आठ) मधील वारस हयात नसतील तरच, गट (नऊ) मधील ‘**आईचा भाऊ**’, ‘**आईची बहीण**’ वारस ठरतील.

- वर्ग २ वारसांच्या नऊ गटांपैकी कोणत्याही गटात प्रक्रांत होणारी संपत्ती, त्यात नमुद वारसांकडे समान हिस्स्यात प्रक्रांत होईल.

- वर्ग २ वारसांच्या नऊ गटांपैकी कोणत्याही गटातील वारस उपलब्ध नसतील तर मयत हिंदू पुरूषाच्या वर्ग '३' (Class III) चे वारस- मयताचे गोत्रज म्हणजे मयताचे पितृबंधू म्हणजेच रक्ताच्या संबंधामुळे किंवा दत्तकग्रहणामुळे पूर्णपणे पुरुषाद्वारे संबंध असलेल्या, एक गोत्र असलेल्या व्यक्ती वारस ठरतील.

- मयत हिंदू पुरूषाच्या वर्ग ‘३' (Class III) चे वारस उपलब्ध नसतील तर मयत हिंदू पुरूषाचे वर्ग ‘४' (Class IV) चे वारस, मयताचे भिन्न गोत्रज - मयताचे मातृबंधू, म्हणजेच रक्ताच्या नात्यामुळे किंवा दत्तकग्रहणामुळे पूर्णपणे पुरुषाद्वारे संबंध नसलेल्या, भिन्न गोत्र असलेल्या व्यक्ती वारस ठरतील.

- मयताला, वारस वर्ग १ ते ४ मधील कोणतही वारस नसल्यास त्याची मिळकत शासन जमा होईल.


THANK
YOU
Dr. Sanjay Kundetkar, Dy. Collector